

# महाराष्ट्र शासन

# अर्थसंकल्पः २०१४-१५

# आदिवासी विकास विभाग

**समर्थन**

**अर्थसंकल्प अध्ययन केंद्र**
११५- समर्थन, धुरी कॉमर्स प्लाझा, वसई स्थानकासमोर,
वसई (पू), ठाणे -४०१ २०८ ✆ ०२५०-२३९०१०३/४
Email: samarthanmumbai97@gmail.com website: www.samarthanadvocacy.org

# समर्थन

स्व. सदानंद वर्दे
(संस्थापक, अध्यक्ष)

अध्यक्ष : श्री. चंद्रशेखर प्रभू
उपाध्यक्ष : श्री. टी. के. चौधरी
कार्याध्यक्ष : श्री. विवेक पंडित

- संपादक -
मुक्ता भारती
-विश्लेषक-
गुरुनाथ सावंत (९९६७७२२९०७)
रुपेश कीर (९८९२९३९६१७)

नोंदणी क्रमांक:
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी
प्रकाशक (पत्रव्यवहार):
समर्थन – ११५-धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड
रेल्वे स्थानकासमोर,
वसई (पू), ठाणे – ४०१ २०८

दूरध्वनी: ०२५०-२३९०१०३/४
Email: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org


## लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे 'समर्थन'

### समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

**'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर**

◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.

◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.

◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.

◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.

◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.

◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.

◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.

◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.

◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# आदिवासी विकास विभाग

**१. ठळक वैशिष्ट्ये:**

## राज्य अर्थसंकल्पात आदिवासी विकास विभाग दुर्लक्षितच:

- आदिवासींच्या कल्याणासाठीचा ९० टक्के निधी शेवटच्या महिन्यांत खर्चिला जातो!
- राज्यात वर्ष २०११ च्या जनगणनेनुसार आदिवासी लोकसंख्या १ कोटी ५ लाख १० हजार असूनही राज्य अर्थसंकल्पापैकी ३ टक्केही रक्कम खर्च होत नाही.
- वर्ष २००५-०६ ते वर्ष २०१२-१३ पर्यंत आदिवासी विकास विभागासाठी सरासरी रु. २ हजार ८०१ कोटी ८३ लाख इतका निधी खर्च करण्यात आला.
- वर्ष २००५-०६ ते वर्ष २०१२-१३ पर्यंत ८ वर्षात राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत सरासरी उपलब्ध निधी केवळ २.४४ टक्के

## आदिवासी उपयोजना: आदिवासींच्या हक्काचे रु. ९ हजार ७९ कोटी २१ लाख शासनाने हडपले!

- वर्ष १९९३-९४ पासून वर्ष २०१३-१४ पर्यंत म्हणजेच आदिवासी उपयोजना कार्यान्वित करण्यात आल्यापासून आदिवासींना त्यांच्या हक्काच्या रु. ९ हजार ७९ कोटी २१ लाखांपासून वंचित ठेवण्यात आले.
- यंदाची वार्षिक योजना ५१ हजार २२२ कोटींची असली तरी आदिवासी उपयोजनासाठी त्याच्या ९.४ टक्के म्हणजेच ४ हजार ८१४ कोटी ९२ लाख प्रस्तावित करण्यात आलेले आहेत.
- गेल्या ९ वर्षातील जिल्हास्तरीय योजनांसाठी उपलब्ध झालेल्या नियतव्ययाचे आदिवासी उपयोजनेच्या तुलनेत सरासरी प्रमाण केवळ ५३ टक्के आहे.
- वर्ष २००५-०६ ते वर्ष २०१३-१४ या कालावधीत एकाही वर्षी आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी नियमानुसार ८५ टक्के नियतव्यय दिला गेलेला नाही.
- डॉ. जयंत पाटील याच्या अध्यक्षतेखालील नेमलेल्या समितीच्या निकषानुसार आरोग्य, शिक्षण, पोषण व ग्रामीण पाणीपुरवठा या क्षेत्रासाठीच्या नियतव्ययामध्ये वर्षानूवर्ष घट होत आहे.
- समितीने केलेल्या निकषानुसार आरोग्यासाठी किमान नियतव्यय १७ टक्के असतानासुद्धा उपलब्ध नियतव्यय हा वर्ष २००९-१० मध्ये १०.८५ टक्के, वर्ष २०१०-११ मध्ये १०.२६ टक्के तर वर्ष २०११-१२ मध्ये तो कमी होऊन ७.८२ टक्के वर्ष २०१२-१३ मध्ये ८.०६ टक्के आणि २०१३-१४ मध्ये ९.५४ टक्के इतकाच उपलब्ध झाला आहे. यावरून आरोग्याविषयीच्या नियतव्ययात सातत्याने घट झालेली आहे हे स्पष्ट होते.
- समितीने केलेल्या निकषानुसार शिक्षणासाठी किमान नियतव्यय ६ टक्के असतानासुद्धा मागील ५ वर्षांत कधीही तेवढा नियतव्यय उपलब्ध केला नव्हता. उपलब्ध नियतव्यय हा वर्ष २००९-१० मध्ये ४.९४ टक्के, वर्ष २०१०-११ मध्ये ४.१७ टक्के तर वर्ष २०११-१२ मध्ये तो ३.८२ टक्के व वर्ष २०१२-१३ मध्ये १.५४ टक्के व २०१३-१४ मध्ये १.६४ टक्क्यांवर घसरला आहे.

## आदिवासी विकास प्रक्रियेत अधिकाऱ्यांची वानवाच:

- ११ एकात्मिक आदवासी विकास प्रकल्पांवर गेल्या २० वर्षात एकूण ७६ अधिकाऱ्यांनी कार्य पाहिले. या एकाही संवेदनशील प्रकल्पावर पूर्ण तेरा वर्षे भा. प्र. सेवा किंवा भा. व. सेवेतील अधिकाऱ्यांनी प्रकल्प अधिकारी म्हणून काम पाहिलेले नाही

## पुरोगामी महाराष्ट्रात सरासरी ५६ टक्के आदिवासी जनता निरक्षर! गळतीचे प्रमाणही गंभीर.

- राज्यातील आदिवासींच्या साक्षरतेच्या प्रमाणामध्ये सर्वात कमी साक्षरतेचे प्रमाण हे धुळे ४२.३ व नंदुरबार ४६.२७ या जिल्ह्यांमध्ये आहे.
- राज्यातील आदिवासी स्त्रीयांच्या साक्षरतेचे प्रमाण केवळ ४८.६९ टक्के
- २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात आदिवासींचे साक्षरतेचे प्रमाण ५६ टक्के आहे.
- वर्ष १९६१ पासून वर्ष २००१ पर्यंत ५३ वर्षांनतरही महाराष्ट्रातील निम्म्याएवढी आदिवासी जनता निरक्षरच.
- **आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये अजूनही ३० ते ४० टक्के विद्यार्थी हे इयत्ता १० वी पर्यंत जाताना गळतात**
- वर्ष २०११-१२ मध्ये शासकीय आश्रमशाळेत इयत्ता ५ वी मध्ये २३ हजार ४१९ विद्यार्थी दाखल झाले परंतु इयत्ता १० वी पर्यंत त्यातील ७ हजार ९३८ विद्यार्थ्यांची गळती होऊन १५ हजार ४८१ विद्यार्थी शिल्लक राहिले. **विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण ३४ टक्के एवढे मोठे होते.** मात्र इयत्ता १२ वी पर्यंत केवळ ८ हजार ८६४ विद्यार्थीच पोहोचतात याचाच अर्थ, १४ हजार ५५५ इतक्या विद्यार्थ्यांची गळती कनिष्ठ महाविद्यालयापर्यंत होते.
- अनुदानित आश्रमशाळेत इयत्ता पाचवीत २७ हजार ४८ विद्यार्थी दाखल झाले होते. दहावी पर्यंत त्यापैकी केवळ १५ हजार ९९३ विद्यार्थी पोहचले, म्हणजे ११ हजार ५५ विद्यार्थ्यांची गळती झाली. दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे गळतीचे **प्रमाण ४१ टक्के एव**ढे मोठे आहे. नंतर इयत्ता १२ वी पर्यंत ६ हजार ५९८ विद्यार्थी गेले याचाच अर्थ तब्बल २० हजार ४५० विद्यार्थ्यांची गळती कनिष्ठ महाविद्यालयापर्यंत झाली होती.
- अनुदानित आश्रमशाळेत ११ हजार ५७९ मुली इयत्ता पाचवीत दाखल झाल्या. त्यापैकी ६ हजार २७० मुली या इयत्ता १० वी पर्यंत पोहचू शकल्या तर उर्वरित ५ हजार ३०५ मुलींची गळती झाली.
- शासकीय आश्रमशाळेत ११ हजार ३६६ मुली इयत्ता पाचवीत दाखल झाल्या. त्यापैकी ७ हजार २२२ मुली या इयत्ता १० वी पर्यंत पोहचू शकल्या तर उर्वरित ४ हजार १४४ मुलींची गळती झाली.

## आदिवासी क्षेत्रातील आश्रमशाळा व रुग्णालयांची दुरवस्था!

- शहापूर तालुक्यातील पेंढरघोळ आश्रमशाळा दहावीच्या परिक्षेचे केंद्र असल्याकारणाने जागेच्या अभावी तेथील मुख्याध्यापकांनी ऐन परीक्षेच्या वेळेस इयत्ता १ ली ते ९ वी च्या विद्यार्थ्यांना २० दिवसांची सुट्टी देऊन घरी पाठविले होते.


## राज्यातील आदिवासी विजेविना अंधारात!

- यवतमाळ जिल्ह्यात एकूण २३७ आदिवासी पाडे असून त्यापैकी ३० पाड्यांमध्ये वीज नाही.

# आदिवासी विकास विभाग व राज्याचा अर्थसंकल्प:

## आदिवासी विकास विभागातील योजनांसाठी निधीची वानवा!

आलेख क्र. १ | रु. कोटीत




| | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ■ अर्थसंकल्पीय अंदाज | ९३८.०३ | १५१९.५ | १८१०.८ | ७६५.४७ | ३०९९.८ | ३८८१.२ | ४३१८.५ | ४४८१.५ | ५२६४.५ |
| □ सुधारित अंदाज | १४६४.८ | १९०७.४ | २४०९.९ | २३६९.८ | २९३५.१ | ३५०२.० | ३७६४.४ | ४४५९.१ | |
| ■ प्रत्यक्ष खर्च | १३३१.४ | १६४४.४ | २०६४.४ | २२१३.४ | २३७२.१ | ३०९५.३ | ३४००.२ | | |

*( स्रोत: अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका व वित्तविषयक विवरणपत्र)*

*(टीप: वर्ष २००१३-१४ सुधारित अंदाज व वर्ष २०१४-१५ अर्थसंकल्पीय अंदाज)*

- वरील आलेख पाहता शासन आदिवासींच्या योजनांसाठी जो सुधारित अंर्थसंकल्प केला जातो त्याप्रमाणात निधी कधीच उपलब्ध करून देत नाही हेच सिद्ध होते.
- वर्ष २०१३-१४ मध्ये योजनांतर्गत खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज रु. ४ हजार ४८१ कोटी ५४ लाख होते. तर सुधारित अंदाज रु. २२ कोटी ४१ लाखांनी (४.६५%) कमी होऊन रु. ४ हजार ४५९ कोटी १३ लाख इतके झाले आहेत म्हणजे वरील आलेखाचा कल पाहता प्रत्यक्षात खर्च त्याहूनही कमी होणार आहे हे निश्चित.
- **वर्ष २०११-१२ मध्ये योजनांतर्गत खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज रु. ३ हजार ८८१ कोटी २३ लाख होते व सुधारित अंदाज रु. ३ हजार ५०२ कोटी होता, मात्र त्यावर्षी उपलब्ध झालेला निधी हा रु. ३ हजार ९५ कोटी ३३ लाख इतका होता, म्हणजे सुधारित अंदाजापेक्षा रु. ४०६ कोटी ६७ लाख (११.६१%) इतका निधी कमी उपलब्ध झाला. यावरुन आदिवासींच्या विकास योजनांबाबतची शासनाची गंभीरता दिसून येते.**
- वर्ष २०१४-१५ मध्ये आदिवासी विकास विभागाने अर्थसंकल्पीय अंदाज रु. ५ हजार २६४ कोटी ५७ लाख इतके केले असले तरी सदरचे अंदाज सुधारित होताना कमी होऊन प्रत्यक्षात खर्च त्याहूनही कमी होईल हे नक्की.

# आदिवासींच्या कल्याणासाठीचा ९० टक्के निधी शेवटच्या महिन्यांत खर्चिला जातो!

**तक्ता क्र.१ सन २०१०-११ च्या शेवटच्या तिमाहीत आणि महिन्यांत केलेला तातडीचा खर्च (rush of expenditure)** *रु.कोटीत*

| अ.क्र. | मुख्य शीर्ष | वर्षातील एकूण खर्च | वर्षाच्या शेवटच्या तिमाहीतील खर्च | | मार्च २०११ मधील खर्च | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | एकूण खर्चाची (%) | रक्कम | एकूण खर्चाची (%) |
| १. | २५१५ इतर ग्रामीण विकास कार्यक्रम | १,१६०.६१ | ७१८.४० | ६१.९० | ६२२.२६ | ५३.६१ |
| २. | ३४५२ पर्यटन | ३९१.५४ | ३७२.९२ | ९५.२४ | ३६४.६६ | ९३.१३ |
| ३. | ३४५६ नागरी पुरवठा | ०.०३ | ०.०३ | १००.०० | ०.०३ | १००.०० |
| **४.** | **४२२५ अनुसूचित जाती,जमाती व इतर मागास वर्गीयांच्या कल्याणावरील मत्ता खर्च** | **४७७.७४** | **४५९.६१** | **९६.२१** | **४२७.८९** | **८९.५७** |
| ५. | ४४०१ पीकसंवर्धनावरील मत्ता खर्च | ०.२१ | ०.१६ | ७६.१९ | ०.१६ | ७६.१९ |
| ६. | ४४०२ मृद व जलसंवर्धनावरील मत्ता खर्च | ५३४.२६ | ४०३.७५ | ७५.५७ | ३६०.०१ | ६७.३८ |
| ७. | ४४०३ पशुसंवर्धनावरील मत्ता खर्च | ३०.२६ | २८.१९ | ९३.१६ | २४.८३ | ८२.०६ |
| ८. | ४४०४ दुग्धव्यवसाय विकासावरील मत्ता खर्च | ०.०४ | ०.०४ | १००.०० | ०.०४ | १००.०० |
| ९. | ५४७५ इतर सामान्य आर्थिक सेवांवरील मत्ता खर्च | ३.५९ | ३.५९ | १००.०० | ३.५९ | १००.०० |
| **१०.** | **६२२५ अनुसूचित जाती,जमाती व इतर मागास वर्गीयांच्या कल्याणाकरिता कर्जे** | **८८.८०** | **८८.७७** | **९९.९७** | **७६.९८** | **८६.६९** |
| ११. | ६४०१ पीक संवर्धनाकरिता कर्जे | १८.५० | १३.१२ | ७०.९२ | १३.१२ | ७०.९२ |
| १२. | ७४७५ इतर सामान्य आर्थिक सेवांसाठी कर्जे | ०.०५ | ०.०५ | १००.०० | ०.०५ | १००.०० |

*(स्त्रोत:भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा राज्य वित्त व्यवस्था अहवाल-३१ मार्च २०११)*

- मुंबई वित्तीय नियम, १९५९ अनुसार , वित्तीय वर्षाच्या अखेरच्या महिन्यात तातडीचा खर्च करणे हे टाळणे आवश्यक आहे. याविरुध्द, वर्ष २०१०-११ मध्ये ९१ उपशीर्षांत रु. १० कोटीहून अधिक आणि वर्षाच्या एकूण खर्चाच्या ५० टक्क्यांपेक्षा देखील जास्त खर्च हा वर्षअखेरीस मार्च महिन्यामध्ये करण्यात आला होता.
- वरील मुख्यशीर्षांपैकी ४२२५ अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीयांच्या कल्याणावरील मत्ता खर्च हे आदिवासींच्या कल्याणासाठी महत्त्वाचे मुख्यशीर्ष आहे, ज्या शीर्षासाठी राज्य शासनाने वर्ष २०१०-११ मध्ये रु. ४७७ कोटी ७४ लाख इतका खर्च केला होता मात्र त्यातील ८९ टक्के खर्च म्हणजेच रु. ४२७ कोटी ८९ लाख हे वर्षअखेरीस म्हणजेच मार्च २०११ या एका महिन्यात केलेला आहे. तर शेवटच्या तीन महिन्यात याच खर्चाचे प्रमाण ९६ टक्के होते. म्हणजेच १०० रुपयातील ९६ रुपये हे शेवतच्या तीन महिन्यात खर्च केले जातात.
- तशाच प्रकारे मुख्यशीर्ष ६२२५ अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीयांच्या कल्याणाकरिता कर्जे यासाठी वर्ष २०१०-११ मध्ये रु. ८८ कोटी ८० लाख इतका खर्च केला होता मात्र त्यापैकी शेवटच्या तीन महिन्यात रु. ८८ कोटी ७७ लाख म्हणजेच ९९.९७ टक्के व शेवटच्या महिन्यात रु. ७६ कोटी ९८ लाख म्हणजेच ८६.६९ टक्के खर्च करण्यात आला.
- **राज्य शासन आदिवासींच्या कल्याणासाठीचा निधी वर्षभरात खर्च करीत नाही व शेवटच्या तिमाहीत किंवा शेवटच्या महिन्यात तो निधी ९९ टक्के खर्च करते व खर्च झाल्याचे दाखवून देते यावरुन राज्य शासन आदिवासींच्या विकासासंबंधी किती गंभीर आहे हे दिसते, व असेच चालत असेल तर महाराष्ट्रातील आदिवासींचा विकास कधीच साध्य होऊ शकत नाही.**

## तातडीने केलेला खर्च :

मुंबई वित्तीय नियम, १९५९ नुसार, वित्तीय वर्षाच्या अखेरच्या महिन्यात खर्च करणे टाळणे आवश्यक आहे. या विरुध्द, १७५ उपशीर्षांतर्गत रु.१० कोटीहून अधिक आणि वर्षाच्या एकूण खर्चाच्या ५० टक्क्यांपेक्षा देखील जास्त खर्च मार्च २०१२ मध्ये झाला. अखेरच्या तिमाहीत ५२ ते १०० टक्के खर्च झालेले आठ मुख्य लेखाशीर्ष खालील तक्त्यामध्ये सादर केले आहेत. या सर्व मुख्य लेखाशीर्षातून मार्च २०१२ मध्ये झालेला खर्च सुद्धा ५२ ते १०० टक्के होता.

तक्ता क्र.२ वर्ष २०११-१२ च्या शेवटच्या तिमाहीत आणि शेवटच्या महिन्यांत केलेला तातडीचा खर्च रु. कोटीत

| अ.क्र | मुख्य शीर्ष | वर्षातील एकूण खर्च | वर्षाच्या शेवटच्या तिमाहीतील खर्च | | मार्च २०१२ मधील खर्च | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | एकूण खर्चाची % | रक्कम | एकूण खर्चाची % |
| १. | ३४५२ पर्यटन | ४१८.५२ | २५७.२० | ६१.४५ | २४२.०२ | ५७.८३ |
| २. | ४२१७ नगर विकासावरील भांडवली खर्च | ४०.०४ | २५.०० | ६२.४४ | २५.०० | ६२.४४ |
| **३.** | **४२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांच्या कल्याणावरील भांडवली खर्च** | **८७७.७५** | **६५२.०२** | **७४.२८** | **५२७.४९** | **६०.१०** |
| ४. | ४४०२ मृद व जलसंवर्धनावरील भांडवली खर्च | ६२४.९९ | ४२७.८६ | ६८.४६ | ३३१.०४ | ५२.९७ |
| ५. | ४४०४ दुग्ध व्यवसाय विकासावरील भांडवली खर्च | ०.०४ | ०.०४ | १००.०० | ०.०४ | १००.०० |
| **६.** | **४२३६ पोषण आहार यावरील भांडवली खर्च** | **६५.८६** | **६५.८६** | **१००.००** | **६५.८६** | **१००.००** |
| ७. | ५४७५ इतर सर्वसाधारण आर्थिक सेवा यांवरील भांडवली खर्च | ४.०७ | २.१३ | ५२.३३ | २.१३ | ५२.३३ |
| ८. | ६२१६ गृहनिर्माणसाठी कर्जे | ०.५६ | ०.४१ | ७३.२१ | ०.४१ | ७३.२१ |

(स्त्रोत:-विनियोजन लेखे, मार्च २०१२ करिताचे मासिक नागरी लेखे आणि महालेखाकार (लेखे आणि अनुज्ञेयता) यांच्याकडून मिळालेली माहिती)

*(स्त्रोत:भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा राज्य वित्त व्यवस्था अहवाल-३१ मार्च २०१२)*

- राज्यात कुपोषणाचे वाढते प्रमाण, कुपोषित महिला व बालके यांची वाढती आकडेवारी समोर येत असताना आपण जर वरील तक्त्यातील पोषण आहारावरील भांडवली खर्च पाहिला तर या शीर्षासाठी वर्ष २०११-१२ मध्ये वर्षभर खर्चच केलेला नसल्याचे दिसून येते व वर्षाअखेरीस मार्च महिन्यामध्ये खर्च दाखविण्यासाठी १०० टक्के खर्च केल्याचे दिसते.
- वर्ष २०११-१२ मध्ये मुख्य शीर्ष ४२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांच्या कल्याणावरील भांडवली खर्च यावरील खर्च पाहिला तर आर्थिक वर्षात एकूण रु. ८७७ कोटी ७५ लाख इतका खर्च करण्यात आलेला आहे. मात्र त्यातील रु. २२५ कोटी ७३ लाख इतका खर्च हा वर्षाच्या पहिल्या ९ महिन्यात करण्यात आला व शेवटच्या ३ महिन्यात रु. ६५२ कोटी २ लाख म्हणजेच ७६ टक्के इतका खर्च करण्यात आला व शेवटच्या मार्च महिन्यात रु. ५२७ कोटी ४९ लाख म्हणजेच ६० टक्के खर्च करण्यात आला.
- वर्ष २०१०-११ प्रमाणे वर्ष २०११-१२ मध्ये देखील या लेखाशीर्षा अंतर्गत खर्च उशीरा दाखविण्यात आलेला आहे यावरुन शासन अनुसूचित जाती/जमाती व इतर मागासवर्गीय यांच्या कल्याणाप्रती किती गंभीर आहे हे दिसून येते.

**योग्य अर्थसंकल्पीय नियंत्रणाची प्राथमिक आवश्यकता असलेल्या खर्चाच्या एकसमान ओघाचा अभाव वरील मुख्य लेखाशीर्षांमध्ये दिसतो यावरून राज्य शासनाची वित्तीय व्यवस्थापनातील कमतरता दिसून येते.**

*- भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक*

## अनुसुचित जमातींच्या कल्याणासाठी खर्च कमी तर बचत जास्त!

भारताचे नियंत्रक व महालेखापरिरीक्षक यांच्या राज्य वित्तव्यवस्थेवरील मार्च, २०१३ मधील अहवालामध्ये असे निदर्शनास आले की *'अनुसूचित जाती/जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण'* यासारख्या महत्त्वाच्या शीर्षावर शासन पुरेसा खर्च करीत नाही.

*तक्ता क्र. ३* *रु. कोटीत*


| वर्ष २०११-१२ | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **क्र** | **क्रमांक आणि अनुदानाचे नाव** | **मूळ तरतूद** | **पूरक तरतूद** | **एकूण** | **प्रत्यक्ष खर्च** | **बचत** |
| **महसूली दत्तमत** | | | | | | |
| १. | N-3 अनुसूचित जाती/जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण | ४७५५.५१ | ५८०.५५ | ५३३६.०६ | ४६४१.७४ | ६९४.३३ |
| २. | T-5 जनजाती क्षेत्र विकास उपयोजनेवरील महसूली खर्च | २६५३.७६ | २१८.५३ | २८७२.२८ | २१७८.५६ | ६९३.७२ |
| **भांडवली दत्तमत** | | | | | | |
| ३. | T-6 आदिवासी क्षेत्र विकास उपयोजनेवरील भांडवली खर्च | १२२६.७३ | १७०.६० | १३९७.३३ | ९२२.९२ | ४७४.४१ |

स्रोत: भारताचे नियंत्रक व महालेखापरीरिक्षक यांचा राज्य वित्तव्यवस्थेवरील अहवाल ३१ मार्च, २०१३

- वरील तक्ता पाहता वर्ष २०११-१२ मध्ये राज्यशासनाने अनुसूचित जाती/जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण या शीर्षाखाली रु. ४७५५ कोटी ५१ लाखांची मुळ तरतूद केली व रु. ५८० कोटी ५५ लाख इतकी पूरक तरतूद अशी एकूण रु. ५३३६ कोटी ०६ लाखांची तरतूद करण्यात आली होती मात्र वर्षाअखेरीस मुळ तरतुदीइतका देखील खर्च करण्यात आलेला नव्हता व रु. ६९४ कोटी ३३ लाखांची बचत करण्यात आली.
- आदिवासी क्षेत्र विकास उपयोजनेवरील भांडवली खर्च या शीर्षाखाली रु. १२२६ कोटी ७३ लाखांची तरतूद करण्यात आलेली होती व रु. १७० कोटी ६० लाखांची पूरक तरतूद अशी एकूण रु. १३९७ कोटी ३३ लाख इतकी तरतूद करण्यात आली होती मात्र त्यामधून खर्च केवळ ९२२ कोटी ९२ लाख इतकाच खर्च करण्यात आला होता व उर्वरित रु. ४७४ कोटी ४१ लाखांची बचत झाली होती.
- राज्यात अनुसूचित जाती/जमाती व इतर मागासवर्ग यांच्या अनेक समस्या असतानादेखील अशा पद्धतीने जादा खर्च दाखवून पूरक मागणीद्वारे अर्थसंकल्प फुगवणे व खर्च कमी करणे व खर्च केलाच तर ८० ते ९० टक्के खर्च हा शेवटच्या तीन महिन्यामध्ये करणे हे शासनाच्या चुकीच्या नियोजनाचे उदाहरण आहेच शिवाय अनुसूचित जाती/जमाती व इतर मागासवर्गीयांच्या प्रती शासनाची उदासीनता दिसून येते.

# विभागाचा मागील ८ वर्षात सरासरी खर्च केवळ २ हजार ८०१ कोटी रुपये!

आलेख क्र.२




| | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | १२३२.७ | १३५४.२ | १९६७.३ | २३२५.६ | १४१८.४ | ३८४४.२ | ४७४७.४ | ५३२२.० | ५६१९.५ | ६५०३.१ |
| सुधारित अंदाज | १४६५.८ | १८८६.१ | २४२२.६ | २९७२.७ | ३१४९.३ | ३७७७.० | ४४४४.३ | ४७८७.५ | ५५९३.० | |
| प्रत्यक्ष खर्च | १३७३.१ | १७६२.५ | २१६१.१ | २६१०.१ | २९१८.२ | ३१८२.९ | ४००५.३ | ४४०१.५ | | |

*( स्रोत: अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका व वित्तविषयक विवरणपत्र)*


*(टीप: वर्ष २०१३-१४चे सुधारित अंदाज व वर्ष २०१४-१५ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- राज्यात वर्ष २०११ च्या जनगणनेनुसार आदिवासींची लोकसंख्या १ कोटी ०५ लाख १० हजार इतकी असूनही राज्याच्या अर्थसंकल्पात विभागाचा वाटा केवळ २.२४ टक्के.
- राज्य शासन हे सातत्याने आदिवासी विकास विभागाला सुधारित अंदाजापेक्षा कमी प्रमाणात निधी उपलब्ध करून देत आल्याचे दिसून येते.
- वर्ष २०१२-१३ मध्ये विभागाने अर्थसंकल्पीय अंदाज रु. ५ हजार ३२२ कोटी इतका केला होता मात्र त्याच्या केवळ ८२ टक्के म्हणजेच रु. ४ हजार ४०१ कोटी ५० लाख निधी उपलब्ध करुन देण्यात आला.
- वर्ष २००५-०६ ते वर्ष २०१२-१३ पर्यंत आदिवासी विकास विभागासाठी सरासरी रु. २ हजार ८०१ कोटी ८३ लाख इतका निधी खर्च करण्यात आला.

## राज्याच्या अर्थसंकल्पातील आदिवासी विकास विभागाचे स्थान.

## राज्यातील ९ टक्के लोकसंख्येवर राज्य अर्थसंकल्पातील सरासरी निधी केवळ २.४४ टक्के!

आलेख क्र. ३ राज्याच्या अर्थसंकल्पातील आदिवासी विकास विभागाचे स्थान.




*( स्त्रोत: अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका व वित्तविषयक विवरणपत्र)*

*(टीप: वर्ष २०१३-१४ सुधारित अंदाज व वर्ष २०१४-१५ अर्थसंकल्पीय अंदाज)*

- वर्ष २००५-०६ ते वर्ष २०१२-१३ या ८ वर्षांच्या कालावधीत कधीही आदिवासी विकास विभागाचे अर्थसंकल्पाचे आकारमान हे ३ टक्क्यांवर गेलेले दिसून येत नाही.
- वर्ष २०१४-१५ मध्ये राज्य अर्थसंकल्पामध्ये विभागाचा अंदाजित वाटा ३.०४ टक्क्यांवर गेला असला तरी प्रत्यक्षात मात्र तो अंदाज असून तेवढा निधी शासनाने विभागाला उपलब्ध करणे गरजेचे आहे.
- वर्ष २००५-०६ ते २०१२-१३ या ८ वर्षात राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत सरासरी उपलब्ध निधी केवळ २.४४ टक्के.
- वर्ष २००७-०८ मध्ये राज्य अर्थसंकल्पातील २.६२ टक्के एवढा निधी उपलब्ध झाला होता व पुढे कमी होत वर्ष २००८-०९ मध्ये २.५९ टक्के इतका झाला व वर्ष २०१०-११ मध्ये हे प्रमाण ०.१७ टक्क्यांनी घसरून २.४२ टक्के इतके झाले.
- आदिवासी विकास विभागाला सातत्याने कमी निधी उपलब्ध करून दिला जात असल्याचा दृश्य परिणाम म्हणून या अर्थसंकल्पाकडे पाहता येईल.

# आदिवासी उपयोजनेचा अनुशेष

## आदिवासींच्या हक्काचे रु. ९ हजार ७९ कोटी २१ लाख शासनाने हडपले!

## यालाच सामाजिक न्याय म्हणायचे काय?

तक्ता क्र. ४ आदिवासी उपयोजनेचा अनुशेष — रु.कोटीत

| वर्ष | वार्षिक योजना नियतव्यय | वार्षिक योजनेचा प्रत्यक्ष खर्च | आदिवासी उपयोजना ९ टक्क्याप्रमाणे अपेक्षित तरतूद | आदिवासी उपयोजना प्रस्तावित तरतूद | प्रत्यक्ष खर्च | अनुशेष (४-६) | आ.उ.यो.वरील खर्चाची वार्षिक यो.खर्चाशी % | आ.उ.यो.वरील खर्चाची प्रस्तावित तरतुदीशी % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १९९३-९४ | ३८०४.०० | ३७८१.४ | ३४२.३६ | २६५.०० | २६६.०० | ७६.३६ | ७.०३ | १०० |
| १९९४-९५ | ४४००.०० | ५१२२.२ | ३९६.०० | ३३०.०० | २७५.०० | १२१ | ५.३६ | ८३.३३ |
| १९९५-९६ | ६०६२.०० | ६६२७.२ | ५४५.५८ | ४१२.५० | ४१२.०० | १३३.५८ | ६.२२ | ९९.८७ |
| १९९६-९७ | ८२८४.०० | ६८४८ | ७४५.५६ | ५८८.५८ | ५३५.०० | २१०.५६ | ७.८१ | ९०.८९ |
| १९९७-९८ | ८३२५.०० | ७९३८ | ७४९.२५ | ५५०.०० | ४९८.०० | २५१.२५ | ६.२७ | ९०.५४ |
| १९९८-९९ | ११६००.७३ | ८१८७.५ | १०४४.०७ | ५६१.०० | ५२०.०० | ५२४.०७ | ६.३५ | ९२.६९ |
| १९९९-०० | १२१६१.६६ | १०४१९ | १०९४.५५ | ५८०.५९ | ४६७.६५ | ६२६.९० | ४.४८ | ८०.५४ |
| २०००-०१ | १२३३०.०० | ९५८६ | ११०९.७० | ५२५.०० | ४४४.०८ | ६६५.६२ | ४.६३ | ८४.५९ |
| २००१-०२ | ११७२०.०० | ८५२६.१ | १०५४.८० | ५६७.०० | ३६६.७७ | ६८८.०३ | ४.३० | ६४.६८ |
| २००२-०३ | ११५६२.०० | ७५३८.७ | १०४०.५८ | ५८५.०० | ३२३.४२ | ७१७.१६ | ४.२९ | ५५.२८ |
| २००३-०४ | १२०५२.०० | ८१८७.७ | १०८४.६८ | ५५५.७३ | ४५०.२२ | ६३४.४६ | ५.४९ | ८१.०१ |
| २००४-०५ | ९६६५.२५ | ९८१७.४ | ८६९.८७ | ५३०.०४ | ३७६.४६ | ४९३.४१ | ३.८३ | ७१.०२ |
| २००५-०६ | ११०१४.०३ | १४६७४ | ९९१.२६ | ९९०.०० | ९२८.५३ | ६२.७३ | ६.३२ | ९३.७९ |
| २००६-०७ | १४८२९.०० | १५६८१ | १३३४.६१ | १३८९.०० | १३२३.०० | ११.६१ | ८.४४ | ९५.२४ |
| २००७-०८ | २०२००.०० | १९४२२ | १८१८.०० | १७९८.०० | १६५८.८८ | १५९.१२ | ८.५४ | ९२.२६ |
| २००८-०९ | २५०००.०० | २२८६१ | २२५०.०० | २२३८.५० | २०२७.४२ | २२२.५८ | ८.८६ | ९०.५७ |
| २००९-१० | २६०००.०० | २७७३१ | २३४०.०० | २३१४.०० | २१३०.०१ | २०९.९९ | ७.६८ | ९२.०४ |
| २०१०-११ | ३७९१७.०० | ३२५७७ | ३४१२.५३ | ३३७४.३५ | २३२३.१५ | १०८९.३८ | ७.१३ | ६८.८४ |
| २०११-१२ | ४१०००.०० | ३७७०७.९ | ३८५४.०० | ३६९३.५० | ३१०६.०० | ७४८.०० | ८.२३ | ८४.०९ |
| २०१२-१३ | ४५०००.०० | ३५८६६.५ | ४२३०.०० | ४००५.०० | ३४०२.५२ | ८२७.४८ | ९.४८ | ८४.९५ |
| २०१३-१४ | ४९०००.०० | ४८०६१.३* | ४६०६.०० | ४१७७.४८ | ४०००.०८ | ६०५.९२ | ८.३२ | ९५.७६ |
| २०१४-१५ | ५१२२२.५४ | | ४८१४.९२ | ४८१४.९२ | | | | |
| | | | | | एकूण | ९०७९.२१ | | |

*(स्त्रोत: वार्षिक योजना भाग -१ वर्ष २०१३-१४) व आदिवासी उपयोजना २०१३-१४ *अपेक्षित खर्च.*

❖ यंदाची वार्षिक योजना ५१ हजार २२२ कोटी ५४ लाखांची असून आदिवासी उपयोजनेसाठी त्याच्या ९.४ टक्के म्हणजेच रु. ४ हजार ८१४ कोटी ९२ लाख प्रस्तावित करण्यात आलेले आहेत.

❖ वर्ष २००४-०५ मध्ये आदिवासी योजनेवर वार्षिक योजनेच्या तुलनेत सर्वात कमी म्हणजे केवळ ३.८३ टक्के निधी उपलब्ध झाला होता.

❖ सन १९९३-९४ ते २०१०-११ या कालावधीत वर्ष २००६-०७ वगळता एकाही वर्षी शासनाने आदिवासी उपयोजनेसाठी राज्य योजनेच्या ९ टक्के तरतूद केलेली नाही.

❖ वर्ष २०११-१२ नंतर जनगणना २०११ नुसार राज्यात आदिवासींची लोकसंख्या ९.४ टक्के इतकी झाली आहे त्यानुसार त्यांना वार्षिक योजनेच्या प्रमाणात ९.४ % नियतव्यय प्रस्तावित करणे गरजेचे होते मात्र जनगणनेचा अहवाल वर्ष २०१३ च्या अखेरीस आल्याकारणाने तसे झालेले नाही तरी आता शासनाने वर्ष २०११-१२ नंतरचा अतिरिक्त अनुशेष आदिवासींना देणे गरजेचे आहे.

❖ वर्ष १९९३-९४ वगळता एकाही वर्षी शासनाने केलेली तरतूद १०० टक्के खर्च केलेली नाही.

❖ वर्ष २०११-१२ मध्ये आदिवासी उपयोजनेचा नियतव्यय रु.३,६९३ कोटी ५० लाख इतका निश्चित करण्यात आला होता त्यापैकी रु. ३,१०६ कोटी निधी (१०० रुपयांपैकी केवळ ८४ रुपये) उपलब्ध झाला.

❖ वर्ष २००५-०६ चा अर्थसंकल्प सादर करताना तात्कालीनवित्तमंत्र्यांनी शासनाच्या स्वीकृत धोरणानुसार राज्य योजनेच्या ९ टक्के तरतूद आदिवासी उपयोजनेसाठी करीत असल्याचे सांगितले. मात्र त्यावर्षीची घोषणा ही कागदावरच राहिली व त्यावेळेस रु.९९० कोटींची तरतूद केलेली असताना प्रत्यक्ष खर्च मात्र रु. ९२८ कोटी एवढाच झाला.

त्यावर्षापासून आजतागायत वित्तमंत्री आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात प्रस्तावित तरतूद करत असतात मात्र प्रत्यक्षात आदिवासीं उपयोजनेचा निधी वळता करणे, नियतव्यय उपलब्ध करुन न देणे, १०० टक्के खर्च न करणे व केलाच तर वर्षाच्या अखेरीस करणे अशा अनेक कारणामुळे आदिवासींच्या हक्काचा असलेला नियतव्यय ९ टक्के किंवा ९.४ टक्के इतका खर्च केलेला कधीही दिसत नाही.

❖ **वर्ष १९९३-९४ पासून वर्ष २०१३-१४ पर्यंत म्हणजेच आदिवासी उपयोजना कार्यान्वित करण्यात आल्यापासून आदिवासींना त्यांच्या हक्काच्या रु. ९ हजार ७९ कोटी २१ लाखांपासून वंचित ठेवण्यात आलेले आहे.**

**इच्छा शक्ती आणि नियोजनाचा अभाव**

**राज्यातील नंदुरबार जिल्ह्यातील धाडगांव अक्कलकुवा या सर्वत्र अतिमागास आदिवासी तालुक्यांचा जलदगतीने विकास व्हावा याकरिता तत्कालीन मा. वित्तमंत्र्यांनी वर्ष २००३-०४ ते वर्ष २००७-०८ पर्यंत कृति आराखडा निश्चित केला होता. या कृति आराखड्याकरिता रु.४० कोटी ९१ लाखाची तरतुदही करण्यात आली होती. परंतु योजनांची अंमलबजावणीच इतकी निकृष्ट होती की, या ५ वर्षाच्या काळात शासनाने तरतूद केलेल्या निधीपैकी ७० टक्के निधीही खर्च केला नाही. राज्यकर्त्यांची इच्छाशक्ती व नियोजनाचा अभाव यावरून सिद्ध होतो.**

*(संदर्भ: भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांचा नागरी अहवाल)*

**जिल्हा नियोजन:**

सुकथनकर समितीने अशी शिफारस केली आहे की आदिवासी उपयोजनेच्या नियतव्ययाचा मोठा भाग आदिवासींना प्रत्यक्ष लाभ देणाऱ्या स्थानिक योजनांसाठी दिला पाहिजे. उदा. लहान पाटबंधाऱ्याच्या योजना, मृद आणि जलसंधारण, ग्रामीण पाणी पुरवठा, जोड रस्ते, माता व बाल आरोग्य इत्यादी योजनांना प्राथम्याने निधी उपलब्ध करून गरजेचे असताना देखील जिल्ह्यांसाठी पुरेसा नियतव्यय खर्च करण्यात येत नाही.

## आदिवासी उपयोजनेतील जिल्हास्तरीय योजनांसाठी मागील आठ वर्षात सरासरी केवळ ५३ टक्के निधी उपलब्ध !

आदिवासींचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या बऱ्याच योजना या जिल्हास्तरीय योजना आहेत. आदिवासी उपयोजनेच्या एकूण नियतव्ययापैकी ६० टक्के नियतव्यय जिल्हा योजनांसाठी व ४० टक्के नियतव्यय हा राज्य योजनांना दिला जाणे अपेक्षित आहे असे वार्षिक योजनेमध्ये नमूद केले असले तरी प्रत्यक्षात मात्र जिल्हा योजनांसाठी कमी नियतव्यय दिला जात असल्याचे खालील तक्त्यावरून दिसते.

(तक्ता. क्र. ५ ) (रु. लाखात)

| वर्ष | एकूण नियतव्यय | राज्यासाठी | जिल्ह्यांसाठी | एकूण नियतव्ययापैकी जिल्ह्यांसाठीची % |
|---|---|---|---|---|
| २००५-०६ | ९९०००.०० | ३१२४०.०० | ६७७६०.०० | ६८.४४ |
| २००६-०७ | १०००००.०० | ४१४००.०० | ५८६००.०० | ५८.६० |
| २००७-०८ | १७९८००.०० | १००२३४.०० | ७९५६६.०० | ४४.२५ |
| २००८-०९ | १९४१५०.०० | ९०३०१.४० | १०३८४८.६० | ५३.४९ |
| २००९-१० | २३१४००.०० | ११३९४.०० | ११५५४५.६० | ४९.९३ |
| २०१०-११ | ३३७४३५.०० | २२६२०६.२३ | १०६८००.०० | ३१.६५ |
| २०११-१२ | ३६९३५०.०० | १५५७५०.०० | २१३६००.०० | ५७.८३ |
| २०१२-१३ | ४००५००.०० | १७८८९०.०० | २२१६१०.०० | ५५.३३ |
| २०१३-१४ | ४१७७४८.०० | १७७४४८.०० | २४०३००.०० | ५७.५२ |
| **एकूण** | **२३२९३८३.००** | **११२८६३.६३** | **१२०७६३०.२०** | **५३.००♣** |

(स्त्रोत : आदिवासी उपयोजना वर्ष २००५-०६ ते वर्ष २०१३-१४) ♣ सरासरी

- गेल्या ९ वर्षातील जिल्हास्तरीय योजनांसाठी उपलब्ध झालेल्या नियतव्ययाचे आदिवासी उपयोजनेच्या तुलनेत सरासरी प्रमाण केवळ ५३ टक्के म्हणजेच १०० रुपयांपैकी केवळ ५३ रुपये हे जिल्हास्तरीय योजनांसाठी खर्च केले जातात.
- वर्ष २००६-०७ ते वर्ष २०१३-१४ पर्यंत कोणत्याही वर्षात जिल्हा योजनांवर होणारा खर्च हा ६० टक्के इतका झालेला दिसत नाही.
- वर्ष २०१०-११ मध्ये तर आदिवासी उपयोजनेच्या नियतव्ययातील केवळ ३१.६५ टक्के नियतव्यय हा जिल्हा योजनेसाठी देण्यात आला होता.
- राज्यातील आदिवासींच्या जास्तीत जास्त योजना या जिल्हास्तरीय असूनही जिल्ह्यांना अपेक्षित ६० टक्के इतकाही नियतव्यय देण्यात येत नसल्याचे वरील तक्त्यावरून स्पष्ट होते.

# आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी वर्षागणिक घटता नियतव्यय

२०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासींची एकूण लोकसंख्या १ कोटी ५ लक्ष १० हजार इतकी आहे व ती राज्याच्या ११ कोटी २३ लक्ष ७४ हजार ३३३ या एकूण लोकसंख्येच्या ९.४ टक्के आहे. राज्यात २००१ च्या जनगणनेनुसार ५१ टक्के आदिवासी आदिवासी उपयोजना क्षेत्रात राहतात व ४९ टक्के आदिवासी उपयोजनेच्या बाहेरील क्षेत्रात राहतात.

१० नोव्हेंबर २००५ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा आदिवासी उपयोजनेच्या नियतव्ययापैकी ८५ टक्के नियतव्यय आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी तर १५ टक्के नियतव्यय आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्रासाठी दिला जाणे अपेक्षित आहे. मात्र आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी वर्षागणिक नियतव्यय घटत चालल्याचे खालील तक्त्यावरुन दिसते.

(तक्ता. क्र.६ ) (रु. लाखात)

| वर्ष | नियतव्यय | | | एकूणचे प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|
| | उपयोजना क्षेत्र | उपयोजनाबाह्य क्षेत्र | एकूण | उपयोजना क्षेत्राशी (अपेक्षित ८५ %) | उपयोजनाबाह्य क्षेत्राशी (अपेक्षित १५ %) |
| २००५-०६ | ५५९९८.१८ | ११७६१.८२ | ६७७६०.०० | ८२.६४ | १७.३६ |
| २००६-०७ | ४७९६४.३३ | १०६३५.६७ | ५८६००.०० | ८१.८५ | १८.१५ |
| २००७-०८ | ६२८१५.३५ | १६७५०.६५ | ७९५६६.०० | ७८.९५ | २१.०५ |
| २००८-०९ | ८१७८६.७१ | २२०६१.८९ | १०३८४८.६० | ७८.७५ | २१.२५ |
| २००९-१० | ८९४८०.८७ | २६०६४.७३ | ११५५४५.६० | ७७.४४ | २२.५६ |
| २०१०-११ | ८४२२९.९२ | २२५७०.०८ | १०६८००.०० | ७८.८६ | २१.१४ |
| २०११-१२ | १५४६१९.६४ | ४४७००.३६ | १९९३२०.०० | ७७.५७ | २२.४३ |
| २०१२-१३ | १७१२७२.११ | ५०३३७.८९ | २२१६१०.०० | ७७.२८ | २२.७२ |
| २०१३-१४ | १८५५४८.०७ | ५४७५१.९३ | २४०३००.०० | ७७.२१ | २२.७९ |
| **एकूण** | **९३३७१५.१८** | **२५९६३५.०२** | **११९३३५०.२०** | **७८.२४** | **२१.७६** |

(स्त्रोत: आदिवासी उपयोजना वर्ष २००५-०६ ते २०१३-१४ आणि
शासन निर्णय क्र. टीएसपी- २००५/प्र. क्र. ५९/का.६, दिनांक :१० नोव्हेंबर २००५.)

- वर्ष २००५-०६ ते वर्ष २०१३-१४ या कालावधीत जिल्हा योजनेपैकी आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी उपलब्ध नियतव्ययाचे प्रमाण केवळ ७८.२४ टक्के आहे तर उपयोजनाबाह्य क्षेत्रासाठी उपलब्ध नियतव्यय २१.७६ टक्के इतका आहे.
- वर्ष २००५-०६ ते वर्ष २०१३-१४ या कालावधीत एकाही वर्षी नियमानुसार ८५ टक्के नियतव्यय दिला गेल्याचे दिसत नाही. विशेष म्हणजे मागील ९ वर्षात देण्यात आलेल्या नियतव्ययाची सरासरी देखील ८५ टक्के होत नाही ती केवळ ७८.९५ टक्के इतकीच होती.
- वरील तक्त्यानुसार वर्ष २००५-०६ मध्ये सर्वात जास्त म्हणजे ८२.६४ टक्के नियतव्यय प्राप्त झाल्याचे दिसते तर वर्ष २०१३-१४ मध्ये सर्वात कमी केवळ ७७.२१ टक्के निधी उपलब्ध झाला.

# आरोग्य, शिक्षण व पोषणासाठी अपेक्षित निधीच उपलब्ध नाही

## आदिवासींच्या शिक्षणावरील नियतव्ययात घट

आदिवासींशी निगडीत समस्यांकरिता पुरेसा निधी प्राथम्याने उपलब्ध व्हावा व त्याकरिता विशिष्ट विकास क्षेत्रांना जिल्हा आदिवासी उपयोजनेमधून किती नियतव्यय उपलब्ध व्हावा यासाठी डॉ. जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने केलेल्या शिफारसी व त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी खालीलप्रमाणे.

(तक्ता क्र: ७)

| क्र. | उपक्षेत्र | निकष (%) | नियतव्यय (%) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ |
| | एकूण जिल्हा आदिवासी उपयोजना | | | | | | |
| १. | मागास कल्याण (आदिवासी विकास विभाग) | किमान ४० | ४५.५७ | ३८.३६ | ३८.९० | ४१.६९ | ४३.३० |
| २. | ग्रामीण पाणी पुरवठा | किमान ३ | २.९१ | २.७३ | २.४५ | २.०४ | २.२० |
| ३. | आरोग्य | किमान १७ | १०.८५ | १०.२६ | ७.८२ | ८.०६ | ९.५४ |
| ४. | शिक्षण (तंत्रशिक्षण/औद्यो. प्रशि. संस्था) | किमान ६ | ४.९४ | ४.१७ | ३.८२ | १.५४ | १.६४ |
| ५. | विद्युत विकास | किमान २ | २.५८ | ३.०३ | ३.०४ | ३.१७ | ३.११ |
| ६. | रस्ते विकास | कमाल १५ | १४.७२ | ९.५१ | ११.२३ | १२.०२ | १०.०७ |
| ७. | लघुपाटबंधारे | किमान ७ | ४.४० | ४.७६ | ६.१६ | ६.६२ | ५.८४ |
| ८. | पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय | कमाल २ | ०.८१ | ०.८० | ०.७२ | ०.८३ | ०.७१ |
| ९. | पोषण | किमान ३ | १.२५ | १.४२ | १.१७ | ०.२२ | ०.१४ |
| १०. | मृदसंधारण | कमाल २ | १.५९ | १.८९ | १.६१ | २.१२ | १.९३ |
| ११. | इतर | ३ % | १०.३८ | २३.०५ | २३.०८ | २१.६९ | २२.२४ |

(स्त्रोत :आदिवासी उपयोजना.वर्ष २००९-१० ते २०१३-१४)

- डॉ. जयंत पाटील याच्या अध्यक्षतेखालील नेमलेल्या समितीच्या निकषानुसार आरोग्य, शिक्षण, पोषण व ग्रामीण पाणी पुरवठा या उपक्षेत्रासाठीच्या नियतव्ययामध्ये वर्षानुवर्ष घट होताना दिसते.
- समितीने केलेल्या निकषानुसार आरोग्यासाठी किमान नियतव्यय १७ टक्के असतानासुद्धा उपलब्ध नियतव्यय हा वर्ष २००९-१० मध्ये १०.८५ टक्के, वर्ष २०१०-११ मध्ये १०.२६ टक्के तर वर्ष २०११-१२ मध्ये तो कमी होऊन ७.८२ टक्के वर्ष २०१२-१३ मध्ये ८.०६ टक्के आणि २०१३-१४ मध्ये ९.५४ टक्के इतकाच उपलब्ध झाल्याचे दिसून येते यावरून आरोग्याविषयीच्या नियतव्ययात सातत्याने घट होत असल्याचे निदर्शनास येते.
- समितीने केलेल्या निकषानुसार शिक्षणासाठी किमान नियतव्यय ६ टक्के असतानासुद्धा मागील ५ वर्षांत कधीही तेवढा नियतव्यय उपलब्ध केला नव्हता. उपलब्ध नियतव्यय हा वर्ष २००९-१० मध्ये ४.९४ टक्के, वर्ष २०१०-११ मध्ये ४.१७ टक्के तर वर्ष २०११-१२ मध्ये तो ३.८२ टक्के व वर्ष २०१२-१३ मध्ये १.५४ टक्के व २०१३-१४ मध्ये १.६४ टक्क्यांवर घसरला आहे.
- आदिवासींचे आरोग्य, शिक्षण, पोषण तसेच लघुपाटबंधारे विकास या उपक्षेत्रांकडे शासनाने सतत दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. वर्ष २०१३-१४ मध्ये शिक्षण, पोषण, विद्युत विकास, रस्ते विकास व लघु पाटबंधारे या महत्त्वाच्या उपक्षेत्रांमध्ये मागील वर्षाच्या प्रमाणात घट झालेली आहे. तसेच 'इतर' या उपक्षेत्रांसाठी ३ टक्के निश्चित केलेले असताना वर्ष २०१२-१३ मध्ये २१.६९ टक्के व वर्ष २०१३-१४ मध्ये २२.२४ टक्के नियतव्यय निश्चित करण्यात आला आहे.
- वर्ष २००९-१० पासून 'इतर' या उपक्षेत्रावर म्हणजेच वरील तक्त्यातील पहिले १० विकास उपक्षेत्र सोडता उर्वरित उपक्षेत्रांच्या नियतव्ययामध्ये वाढ होताना दिसते. त्याचा निकष ३ टक्के असतानादेखील वर्ष २०१०-११ व २०११-१२ मध्ये तर तो २३ टक्क्यांच्या वर दिसतो. म्हणजेच तब्बल २० टक्क्यांनी जास्त आहे.

# अतिसंवेदनशील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पावर
# एकही अधिकाऱ्यांनी आपला कार्यकाल पूर्ण केलेला नाही.

*(तक्ता.८) १९९३ ते २०१३ या कालावधीत संवेदनशील प्रकल्पावरील भाप्रसे किंवा भावसेतील प्रकल्प अधिकारी*

| अ.क्र. | एकात्मिक प्रकल्प | भाप्रसेवा किंवा भावसेवा अधिकाऱ्यांची एकूण संख्या | २० वर्षांमध्ये अधिकाऱ्यांचा एकत्रित अंदाजित कार्यकाल | प्रकल्प अधिकारी कार्यरत नाहीत |
|---|---|---|---|---|
| १. | कळवण | ७ | ५ वर्ष ०५ महिने १० दिवस | २६ जून २००८ पासून |
| २. | तळोदा | ६ | ३ वर्ष ०७ महिने २० दिवस | - |
| ३. | नाशिक | ५ | ४ वर्ष ०७ महिने ०० दिवस | - |
| ४. | धारणी | १३ | ९ वर्ष ०९ महिने ०४ दिवस | - |
| ५. | पांढरकवडा | १ | २० सप्टेंबर २०१३ ते आजतागायत | - |
| ६. | किनवट | ३ | ३ वर्ष १० महिने १८ दिवस | २ मार्च १९९८ पासून |
| ७. | गडचिरोली | ५ | ५ वर्ष ०४ महिने २५ दिवस | १ सप्टेंबर २०१० पासून |
| ८. | भामरागड | ७ | ११ वर्ष ०६ महिने ११ दिवस | ३० जून २०११ पासून |
| ९. | अहेरी | १५ | ११ वर्ष ०७ महिने २३ दिवस | - |
| १०. | डहाणू | ६ | ६ वर्ष ०२ महिने २४ दिवस | - |
| ११. | जव्हार | ८ | ३ वर्ष ०५ महिने १० दिवस | २१ जून २००५ पासून |
| | **एकूण** | **७६** | | |

*( स्त्रोत :माहितीच्या अधिकारांतर्गत प्राप्त माहिती १४ ऑगस्ट २०१३)*

- नाशिक येथील एकात्मिक आदिवासी प्रकल्पावर ५ भा.प्र.से. अधिकाऱ्यांनी काम केले वर्ष १९९३ ते २०१३ या २० वर्षाच्या कालावधीत एकत्रित कार्यकाल ४ वर्ष ०७ महिने इतका कमी होता.
- अहेरी या एकात्मिक विकास प्रकल्पावर भा.प्र.से. १५ अधिकाऱ्यांनी काम केले त्यांचा एकत्रित कार्यकाल ११ वर्षे ७ महिने २३ दिवस इतका राहिला आहे.
- धारणी येथील प्रकल्पावर ९ वर्ष ९ महिने ४ दिवसात १३ प्रकल्प अधिकाऱ्यांनी काम पाहिले.
- एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किनवट येथे १९९३ ते १९९८ पर्यंत केवळ ३ प्रकल्प अधिकाऱ्यांनी काम केले होते यावरून अधिकारी व शासन यांची या प्रकल्पांबाबत उदासिनता स्पष्ट होते.
- कळवण, तळोदा, धारणी, अहेरी, भामरागड या ५ प्रकल्पांवर काही अधिकाऱ्यांच्या सेवेत खंड पडून पुन्हा रुजू झाले.
- ११ एकात्मिक आदवासी विकास प्रकल्पांवर गेल्या २० वर्षात एकूण ७६ अधिकाऱ्यांनी काम पाहिले.
- ११ पैकी एकाही संवेदनशील प्रकल्पावर पूर्ण २० वर्षे भा. प्र. सेवा किंवा भा. व. सेवेतील अधिकाऱ्यांनी प्रकल्प अधिकारी म्हणून काम पाहिलेले नाही.
- वरील ११ प्रकल्पांपैकी काही प्रकल्पांवर प्रकल्प अधिकारी कार्यरत नसल्याचे दिसून येते उदा. कळवण २००८ पासून, किनवट १९९८ पासून, गडचिरोली २०१० पासून, भामरागड २०११ पासून, व जव्हार २००५ पासून प्रकल्प अधिकारी कार्यरत नसल्याचे दिसून येते.

## भारताच्या जनगणनेनुसार (२०११) राज्यातील अनुसूचित जाती अनुसूचित जमातींविषयीची काही निरिक्षणे.

### पिण्याच्या पाण्याच्या मुख्य स्त्रोतानुसार कुटुंबांची संख्या

तक्ता क्र. ९

| क्र. | पाण्याच्या स्त्रोताचा प्रकार | शहरी लोकसंख्या | | ग्रामीण लोकसंख्या | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ.जा | अ.ज. | अ.जा. | अ.ज. | अ.जा. | अ.ज. |
| १ | नळाद्वारे पाणीपुरवठा | १३,३५,८६८ | ४,८५,८५१ | ९,१७,३२४ | ६,१५,०२२ | २२,५३,१९२ | ११,००,८७३ |
| २ | ट्युबवेलद्वारे पाणीपुरवठा | ५८,८३१ | २३,२३९ | १,१३,४७३ | ७३,०३४ | १,७२,३०४ | ९६,२७३ |
| ३ | नदी किंवा कालव्याने | १,३५९ | ७०४ | ७,३९५ | २४,८८४ | ८,७५४ | २५,५८८ |

स्त्रोत: भारताची जनगणना २०११, गृह मंत्रालयाचे संकेतस्थळ.

- वरील आकडेवारीनुसार जनगणना २०११ नुसार एकूण १ कोटी ५ लाख १० हजार २१३ इतकी आदिवासींची लोकसंख्या असताना ११ लाख ८७३ कुटुंबांना नळाद्वारे पाणी पुरवठा होत होता . तर ९६ हजार २७३ कुटुंबांना ट्युबवेलद्वारे व २५ हजार ५८८ कुटुंबांना नदी किंवा कलव्याद्वारे पाणीपुरवठा होत होता.

**निवासी घरांच्या परिस्थितीनुसार कुटुंबांची संख्या**

- शहरी भागातील ४५ हजार ५१२ अनुसूचित जातींच्या कुटुंबांची घरे राहण्यास योग्य नव्हती. तर अनुसूचित जमातींच्या २१ हजार ६४ कुटुंबांची घरे राहण्यास योग्य नव्हती.
- तर ग्रामीण भागातील हीच संख्या १लाख ६२ हजार ३०५ कुटुंबांची घरे राहण्यास अयोग्य अशा जीर्ण अवस्थेत होती. अनुसूचित जमातींच्या बाबतीत ही संख्या १लाख ६८ हजार ४९७ कुटुंबे इतकी होती.

**प्रकाशाच्या मुख्य स्त्रोतानुसार कुटुंबांची संख्या**

- ग्रामीण भागातील अनुसूचित जातींच्या १२लाख ०३ हजार ७१८ कुटुंबांचा तर ९ लाख ३८ हजार ७४९ अनुसूचित जमातींच्या कुटुंबांचा प्रकाशाचा मुख्य स्त्रोत वीज हा होता.
- ग्रामीण भागातील ३२ हजार ३१४ अनुसूचित जातींच्या तर ४३ हजार ३९४ अनुसूचित जमातीच्या कुटुंबांकडे प्रकाशाचे कोणतेही स्त्रोत नव्हते.

**शौचालयाच्या उपलब्धतेनुसार कुटुंबांची संख्या**

- शहरी भागातील ६लाख ३४ हजार ३२६ अनुसूचित जातींच्या तर २लाख ३३ हजार ००१ अनुसूचित जमातींच्या कुटुंबांकडे शौचालयाची उपलब्धता नव्हती.
- ग्रामीण भागातील हीच संख्या ११ लाख ९७ हजार ७८४ अनुसूचित जातींची कुटुंबे तर १४ लाख ७७ हजार ०५२ अनुसूचित जमातींची कुटुंब इतकी होती.

## राज्यात आदिवासींची साक्षरता ५६ टक्के तर आदिवासी महिलांची साक्षरता ४९ टक्के!

तक्ता क्र.१० जनगणना २०११ नुसार आदिवासींची लोकसंख्या व साक्षरता

| जिल्हे | आदिवासींची लोकसंख्या | | | आदिवासींची साक्षरता | | | एकूण साक्षरतेचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकुण | पुरुष | महिला | एकुण | पुरुष | महिला | |
| ठाणे | १५४२४५१ | ७६९१९२ | ७७३२५९ | ७६११२१ | ४४०६५४ | ३२०४६७ | ४९.३४ |
| रायगड | ३०५१२५ | १५३६५७ | १५१४६८ | १४९६१० | ८६२१७ | ६३३९३ | ४९.०३ |
| रत्नागिरी | २०३७४ | १०४०२ | ९९७२ | ११४१९ | ६६६२ | ४७५७ | ५६.०५ |
| धुळे | ६४७३१५ | ३२७०३४ | ३२०२८१ | २७४३१३ | १६०४२१ | ११३८९२ | ४२.३८ |
| नंदूरबार | ११४१९३३ | ५६८०२६ | ५७३९०७ | ५२८३७८ | ३००४५६ | २२७९२२ | ४६.२७ |
| जळगाव | ६०४३६७ | ३१०१५० | २९४२१७ | २९५९१२ | १७६१३१ | ११९७८१ | ४८.९६ |
| नाशिक | १५६४३६९ | ७९२५४७ | ७७१८२२ | ८७१०१७ | ४९३९८५ | ३७७०३२ | ५५.६८ |
| अहमदनगर | ३७८२३० | १९११६५ | १८७०६५ | १९८३०६ | ११६३३९ | ८१९६७ | ५२.४३ |
| पुणे | ३४८८७६ | १७९१३२ | १६९७४४ | २१९३१२ | १२४३८० | ९४९३२ | ६२.८६ |
| सोलापूर | ७७५९२ | ३९७८५ | ३७८०७ | ४६७४७ | २७२४२ | १९५०५ | ६०.२५ |
| सातारा | २९६३५ | १५२१० | १४४२५ | १८२६९ | १०१७३ | ८०९६ | ६१.६५ |
| कोल्हापूर | ३०२०६ | १५४७८ | १४७२८ | २१२७६ | ११७८४ | ९४९२ | ७०.४४ |
| सांगली | १८३३३ | ९४०६ | ८९२७ | ११९३० | ६५८० | ५३५० | ६५.०७ |
| सिंधुदुर्ग | ६९७६ | ३५७५ | ३४०१ | ५०७५ | २७४२ | २३३३ | ७२.७५ |
| औरंगाबाद | १४३३६६ | ७३८७६ | ६९४९० | ७४२३८ | ४४५२५ | २९७१३ | ५१.७८ |
| जालना | ४२२६३ | २१९८८ | २०२७५ | २२८९० | १३८४८ | ९०४२ | ५४.१६ |
| परभणी | ४०५१४ | २०५७० | १९९४४ | २२७३४ | १३२८१ | ९४५३ | ५६.११ |
| हिंगोली | १११९५४ | ५७६७४ | ५४२८० | ६८२४८ | ३९७२९ | २८५१९ | ६०.९६ |
| लातूर | ५७४८८ | २९८७२ | २७६१६ | ३५८०८ | २०५०४ | १५३०४ | ६२.२९ |
| उस्मानाबाद | ३६०३९ | १८५६९ | १७४७० | २०५८७ | १२०३६ | ८५५१ | ५७.१२ |
| बीड | ३२७२२ | १६८०६ | १५९१६ | १८६०७ | १०७२० | ७८८७ | ५६.८६ |
| नांदेड़ | २८१६९५ | १४३८९२ | १३७८०३ | १७२६५९ | १००४७६ | ७२१८३ | ६१.२९ |
| अकोला | १००२८० | ५१३५९ | ४८९२१ | ६९२९९ | ३८७८९ | ३०५१० | ६९.११ |
| वाशिम | ८०४७१ | ४१४०३ | ३९०६८ | ५१७२७ | २९७७१ | २१९५६ | ६४.२८ |
| अमरावती | ४०४१२८ | २०५८३४ | १९८२९४ | २६१७५३ | १४७६११ | ११४१४२ | ६४.७७ |
| यवतमाळ | ५१४०५७ | २६०८९६ | २५३१६१ | ३४४२६७ | १९२६५३ | १५१६१४ | ६६.९७ |
| बुलढाणा | १२४८३७ | ६४१५३ | ६०६८४ | ७१५७३ | ४१५५३ | ३००२० | ५७.३३ |
| नागपूर | ४३७५७१ | २२३५६६ | २१४००५ | ३२०१४२ | १७४८७४ | १४५२६८ | ७३.१६ |
| वर्धा | १४९५०७ | ७६६९८ | ७२८०९ | १०५४७३ | ५८७१९ | ४६७५४ | ७०.५५ |
| भंडारा | ८८८८६ | ४४५१५ | ४४३७१ | ६३१२० | ३४७३८ | २८३८२ | ७१.०१ |
| गोंदिया | २१४२५३ | १०५९४४ | १०८३०९ | १५१३३९ | ८३२६० | ६८०७९ | ७०.६४ |
| चंद्रपूर | ३८९४४१ | १९६७५३ | १९२६८८ | २५६३६३ | १४३९७१ | ११२३९२ | ६५.८३ |
| गडचिरोली | ४१५३०६ | २०७३७७ | २०७९२९ | २४८४६९ | १३९०४९ | १०९४२० | ५९.८३ |
| राज्य | **१०५१०२१३** | **५३१५०२५** | **५१९५१८८** | **५८८७१६१** | **३३५७५४३** | **२५२९६१८** | **५६.०१** |

स्रोत : जनगणना २०११

- जनगणना २०११ नुसार राज्यात आदिवासींची लोकसंख्या १ कोटी ५ लाख १० हजार २१३ इतकी असून त्यापैकी साक्षर आदिवासी ५८ लाख ८७ हजार १६१ इतकी (५६.०१ टक्के) आहे.
- राज्यात आदिवासी महिलांची लोकसंख्या ५१ लाख ९५ हजार १८८ इतकी असून त्यापैकी साक्षर महिलांची संख्या २५ लाख २९ हजार ६१८इतकी (४८.६९ टक्के) आहे

## आदिवासी उपयोजना क्षेत्रातील इयत्तावार व स्तरनिहाय विद्यार्थी संख्या व गळती

(तक्ता क्र ११)

| विभाग | इयत्ता | | एकूण विद्यार्थी संख्या (२०११-१२) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | शासकीय आश्रमशाळा | | | अनुदानित आश्रमशाळा | | |
| | | | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण |
| प्राथमिक | १ | | ७७७४ | ६८५७ | १४६३१ | १२८८७ | ९९१३ | २२८०० |
| | २ | | ८७५९ | ७९९३ | १६७५२ | १३५८९ | १००७५ | २३६६४ |
| | ३ | | ९३२७ | ८३४० | १७६६७ | १३८३० | १०१२४ | २३९५४ |
| | ४ | | ९४१४ | ८५९६ | १८०१० | १३६३७ | १०२५६ | २३८९३ |
| | ५ | | १२०५३ | ११३६६ | २३४१९ | १५४६९ | ११५७९ | २७०४८ |
| | ६ | | ११९७१ | १०९८२ | २२९५३ | १५०१६ | ११३७० | २६३८६ |
| | ७ | | १०९८८ | १०५५१ | २१५३९ | १४२९४ | १०४८६ | २४७८० |
| माध्यमिक | ८ | | १०८०१ | १०१९० | २०९९१ | १४२५४ | ९९०५ | २४१५९ |
| | ९ | | ९९४१ | ८८३२ | १८७७३ | १३९१९ | ९०३५ | २२९५४ |
| | १० | | ८२५९ | ७२२२ | १५४८१ | ९७२३ | ६२७० | १५९९३ |
| | **एकूण** | | **९९२८७** | **९०९२९** | **१९०२१६** | **१३६६१८** | **९९०१३** | **२३५६३१** |
| कनिष्ठ महाविद्यालय | ११ | कला | २८७७ | २५१६ | ५३९३ | २०५२ | ११५८ | ३२१० |
| | | विज्ञान | १६९४ | १३३६ | ३०३० | १७७३ | ८२३ | २५९६ |
| | १२ | कला | २९०६ | २४३० | ५३३६ | २३४० | १२१० | ३५५० |
| | | विज्ञान | २०४९ | १४७९ | ३५२८ | २१९६ | ८५२ | ३०४८ |
| | **एकूण** | | **९५२६** | **७७६१** | **१७२८७** | **८३६१** | **४०४३** | **१२४०४** |
| **एकूण** | | | **१०८८१३** | **९८६९०** | **२०७५०३** | **१४४९७९** | **१०३०५६** | **२४८०३५** |

(स्त्रोत : वार्षिक आदिवासी उपयोजना २०१३-१४) सदर माहिती वर्ष २०११-१२ ची आहे

- वरील तक्त्यानुसार आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळेमधील विद्यार्थ्यांची संख्या ही प्राथमिक विभागातून माध्यमिक विभागापर्यंत कमी होताना दिसते.
- शासकीय आश्रमशाळेत इयत्ता ५ वी मध्ये २३ हजार ४१९ विद्यार्थी दाखल झाले परंतु इयत्ता १० वी पर्यंत त्यातील ७ हजार ९३८ विद्यार्थ्यांची गळती होऊन १५ हजार ४८१ विद्यार्थी शिल्लक राहिले. **विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण ३४ टक्के एवढे मोठे होते.** मात्र इयत्ता १२ वी पर्यंत केवळ ८ हजार ८६४ विद्यार्थीच पोहोचतात याचाच अर्थ १४ हजार ५५५ विद्यार्थ्यांची गळती कनिष्ठ महाविद्यालयापर्यंत दिसते.
- अनुदानित आश्रमशाळेत इयत्ता पाचवीत २७ हजार ४८ विद्यार्थी दाखल झाले होते. दहावी पर्यंत त्यापैकी केवळ १५ हजार ९९३ विद्यार्थी पोहचले, म्हणजे ११ हजार ५५ विद्यार्थ्यांची गळती झाली. दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे गळतीचे **प्रमाण ४१ टक्के एव**ढे मोठे आहे. नंतर इयत्ता १२ वी पर्यंत ६ हजार ५९८ विद्यार्थी दिसतात याचाच अर्थ तब्बल २० हजार ४५० विद्यार्थ्यांची गळती कनिष्ठ महाविद्यालयापर्यंत दिसते.
- अनुदानित आश्रमशाळेत ११ हजार ५७९ मुली इयत्ता पाचवीत दाखल झाल्या. त्यापैकी ६ हजार २७० मुली या इयत्ता १० वी पर्यंत पोहचू शकल्या तर उर्वरित ५ हजार ३०५ मुलींची गळती झाली.
- शासकीय आश्रमशाळेत ११ हजार ३६६ मुली इयत्ता पाचवीत दाखल झाल्या. त्यापैकी ७ हजार २२२ मुली या इयत्ता १० वी पर्यंत पोहचू शकल्या तर उर्वरित ४ हजार १४४ मुलींची गळती झाली.
- **आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये अजूनही ३० ते ४० टक्के विद्यार्थी हे इयत्ता १० वी पर्यत जाताना गळतात हेच वरील तक्त्यावरुन सिद्ध होते**

# आदिवासी क्षेत्रातील आश्रमशाळा व रुग्णालयांची दुरवस्था!

**श्रमजीवी संघटना व समर्थन या संस्थेने महाराष्ट्र विधानसभा सदस्य व लोकलेखा समिती सदस्य विवेक पंडित यांच्या समक्ष नाशिक, ठाणे, पुणे व रायगड जिल्ह्यांमध्ये दौरे करुन आदिवासी भागातील काही आश्रमशाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, व ग्रामीण रुग्णालयांचे पंचनामे केले असता त्यातून निदर्शनास आलेले महत्त्वाचे निकषः-**

नाशिक जिल्ह्यातील वैतरणा, शिरसाठे, आंबोली, तसेच ठाणे जिल्ह्यातील न्याहाळे, नांदगाव, पिसे, गुंज, दाभोसा, परळी, देहरे, दादडे, रायगड जिल्ह्यातील सुधागड येथील जांभुळपाडा व पुण्यातील मावळ येथील काही शासकीय आश्रमशाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये, उपकेंद्र व जिल्हा रुग्णालये यांना प्रत्यक्ष भेट देऊन फेब्रुवारी व मार्च २०१३ रोजी श्रमजीवी संघटना व समर्थन या संस्थेने महाराष्ट्र विधानसभा सदस्य व लोकलेखा समिती सदस्य श्री. विवेक पंडित यांच्या समक्ष पंचनामे केले त्यातून खालीलप्रमाणे काही महत्त्वाचे निकष निदर्शनास आले जे अतिशय गंभीर असून त्यावरून शासनाची आदिवासींप्रती व आदिवासींच्या विकासाप्रती उदासिनता दिसून येते.

- **शहापूर तालुक्यातील पेंढरघोळ आश्रमशाळा दहावीच्या परिक्षेचे केंद्र असल्याकारणाने जागेच्या अभावी तेथील मुख्याध्यापकांनी ऐन परीक्षेच्या वेळेस इयत्ता १ ली ते ९ वी च्या विद्यार्थ्यांना २० दिवसांची सुट्टी देऊन घरी पाठविले होते.**
- वाडा तालुक्यातील गुंज, जव्हार तालुक्यातील न्याहाळे, दाभोसा, देहरे, नांदगाव, दादडे, भिवंडीतील पिसे नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबक तालुक्यातील आंबोली व इगतपूरी येथील वैतरणा या शासकीय आश्रमशाळांमध्ये स्नानगृहे व शौचालये नादुरुस्त असल्याकारणाने मुले व मुलींना शौचालयास व आंघोळीसाठी बाहेर ओढ्यावर किंवा नदीवर जावे लागत होते.
- भिवंडीतील पिसे शासकीय आश्रमशाळेची इमारत ही सन १९८० रोजी भातसा प्रकल्पासाठी बांधण्यात आलेली इमारत आहे व तिचे बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे असून त्यातच मुलांचे वर्ग व निवासाची व्यवस्था आहे. **सदर आश्रमशाळेची इयत्ता ३ री च्या वर्गाची दिनांक ११ फेब्रुवारी २०१३ रोजी रात्री ८.३० च्या दरम्यान भिंत कोसळून ७ मुले जखमी झाल्याचे देखील निदर्शनास आले.**
- जव्हार येथील देहरे शासकीय आश्रमशाळेच्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध झाला असूनही इमारत अद्यापही बांधण्यात आलेली नाही, तर विक्रमगड येथील दादडे येथील आश्रमशाळेसाठी निवासी इमारत मंजूर असूनही बांधण्यात आलेली नव्हती.
- जव्हार येथील दाभोसा शासकीय आश्रमशाळेमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय नव्हती तर पाणी विकत घेतले जात असल्याचे मुख्याध्यापकांनी सांगितले.
- जव्हार तालुक्यातील दाभोसा आश्रमशाळेतून वैद्यकीय सुविधांची वारंवार मागणी करुनही सदर सुविधा अद्यापही मिळालेल्या नाहीत.

- भिवंडीतील पिसे, वाडा तालुक्यातील गुंज, जव्हार येथील देहरे या आश्रमशाळांमध्ये निवासी मुला-मुलींना झोपण्यासाठी स्वतंत्र खोल्या उपलब्ध नव्हत्या, चादरी, ब्लँकेट देखील जुनेच वापरात आणले जात होते.
- नाशिक जिल्ह्यातील वैतरणा, शिरसाठे, आंबोली, तसेच ठाणे जिल्ह्यातील न्याहाळे, नांदगाव या शासकीय आश्रमशाळांची परिस्थिती पाहता आश्रमशाळांमध्ये मुलांना आंघोळीसाठी पाणी नव्हते तर स्नानगृहे व स्वच्छतागृहांची अवस्था इतकी बिकट होती की त्यांचा वापरच होत नसल्याचे दिसून आले.
- नाशिक येथील इगतपूरीतील शिरसाठे आश्रमशाळेत जागेचे मालक गोपाळ लहानगे हे स्वत:च भाजीपाल्याचे कंत्राट घेऊन भाजीपाला पुरवित होते. तसेच त्यांच्या पत्नी अनिशा गोपाळ लहानगे या शाळा व्यवस्थापन समितीवर असल्याचे निदर्शनास आले.
- **पंचनामा केलेल्या सर्वच आश्रमशाळेत साखर ही केवळ २६ जानेवारी व १५ ऑगस्ट रोजीच आणि ती देखील राष्ट्रीय सणाकरिताच उपलब्ध होत होती.**
- पंचनामे केलेल्या सर्वच आश्रमशाळांमध्ये वर्गखोल्या, भांडारगृह, स्वयंपाक गृह व धान्यांची कोठारे अस्वच्छ होती तर धान्यांचा दर्जा हा अतिशय निकृष्ट स्वरुपाचा आढळून आला.
- पंचनामे केलेल्या सर्वच आश्रमशाळांमध्ये एक फळ म्हणून 'सडक संत्र' दिलं जात होतं (**महाराष्ट्र स्टेट कंझ्युमर फेडरेशन यांच्याकडून घोडेगाव, जिल्हा पुणे येथील एक ठेकेदार नेमण्यात आला आहे ज्याने उप ठेकेदार नेमले आहेत व त्यांच्याकडून राज्यातील सर्व आश्रमशाळांना अशाप्रकारची संत्री पुरविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले**)
- जव्हार तालुक्यातील दाभोसा, देहरे, न्याहाळे, नांदगाव येथे विद्यार्थ्यांना ८ ते १० दिवसातून एकदा अंडी दिली जात होती.

## अपुऱ्या आरोग्य सुविधा:

- सर्वच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कक्ष (ward), शौचालये व स्वच्छता गृह अतिशय अस्वच्छ अशा स्वरुपाचे होते.
- पतंगशहा कुटीर रुग्णालय, जव्हार येथील सर्जन एम.एम. नागरगोजे हे नियुक्त झाल्यापासूनच सलग दीड वर्षाहून अधिक काळ गैरहजर असल्याचे निदर्शनास आले.
- पंचनामे केलेल्या सर्व आरोग्य संस्थांमध्ये औषधांचा तुटवडा होता व जो साठा होता त्यांचा पुरवठा देखील वेळेवर होत नसल्याचे निदर्शनास आले.
- वैतरणा प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दाखल रुग्णांना जेवणाची सोय वैद्यकीय अधिकारी स्वत:च्या भत्त्यांतील पैशामधून करतात.
- जव्हार ग्रामीण रुग्णालयातील दाखल रुग्णांना पाण्याअभावी शौचालयासाठी चक्क बाहेर जावे लागत होते.
- मोखाडा ग्रामीण रुग्णालयात प्रसुतीगृहाची अवस्था फारच बिकट होती, बालरोग तज्ज्ञांची जागा रिक्त होती, स्टॉक रजिस्टर व हजेरी पट रोजच्या रोज भरले गेले नव्हते, रुग्णांना पेपर वर जेवण दिले जात होते. रुग्णालयामध्ये पुरेसे बेड, चादरी, ब्लँकेट देखील नव्हते.

# राज्यातील आदिवासी विजेविना अंधारात!

## अनुसूचित जमाती व कल्याण समितीच्या अहवालातील महत्त्वाचे मुद्दे

**अनुसूचित जमाती उपभोक्तांसाठी कृषी वीज पंप जोडणी योजना :**

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विभागातर्फे १०० टक्के अनुदानित (सबसीडी) योजनेंतर्गत असलेल्या अनुसूचित जमातीच्या उपभोक्तांसाठी सेवा जोडणी आकार घेतला जात नाही. तसेच कृषी वीज पंप हे शासनातर्फे अनुदान स्वरुपात देण्यात येत असतात. त्यांना शेतीसाठी वीज पुरवठा देताना प्राधान्य देण्यात येते. मागील तीन वर्षात कृषी वीज पंप जोडण्या दिलेल्या उपभोक्तांची संख्या खालीलप्रमाणे आहे :-

तक्ता क्र. १२

| वर्ष | वीज जोडणीसाठी अनुसूचित जमातीचे प्रलंबित अर्ज संख्या | अनुसूचित जमातीच्या अर्जदारांना एकूण दिलेली वीज जोडणी | अनुसूचित जमातीच्या अर्जदारांची वर्षअखेर प्रलंबित वीज जोडणी |
|---|---|---|---|
| २००६-०७ | १०५९ | २६८ | ७९१ |
| २००७-०८ | ७९१ | १०० | ६९१ |
| २००८-०९ | ६९१ | २२९ | ४६२ |
| **एकूण** | | **५९७** | |

स्त्रोत: अनुसूचित जमाती कल्याण समिती अहवाल क्र. ४ (वर्ष २०१०-११)

समितीने अनुसूचित जमातीच्या लोकांच्या कल्याणासाठी जिल्ह्यातील आदिवासी पाडे, वस्त्या वगैरे या ठिकाणी कोणत्या योजना राबविल्या आहेत अशी पृच्छा केली असता अधिक्षक अभियंता यांनी यवतमाळ जिल्ह्यात १८६९ गावे आहेत. त्यातील ५६७ गावे ही आदिवासी उपयोजनेत समाविष्ट करण्यात आलेली आहेत त्यापैकी ५९४ गावांचे विद्युतीकरण करण्यात आलेले असून **६३ गावांचे विद्युतीकरण व्हावयाचे आहे. म्हणजेच गावातील १० टक्के घरांमध्ये वीज गेलेली असेल तर त्या गावाचे विद्युतीकरण झालेले आहे असे मानले जाते अशी समितीला माहिती दिली**.

गावांचे विद्युतीकरण करण्यात आलेले आहे म्हणजे आपण नेमके काय केले आहे, गावापर्यंत वीज दिलेली आहे की, गावातील आदिवासींच्या घरामध्ये प्रत्यक्ष वीज दिलेली आहे अशी समितीने विचारणा केली असता मुख्य अभियंता यांनी जिल्ह्यात एकूण **२३७ आदिवासी पाडे असून त्यापैकी ३० पाड्यांचे विद्युतीकरण व्हायचे आहे**. विद्युतीकरण बाकी असलेल्या गावांचा आणि पाड्यांचा समावेश राजीव गांधी विद्युतीकरण योजनेंतर्गत करण्यात आला आहे. **राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेतून यवतमाळ जिल्ह्यासाठी २५.१७ कोटी रुपये मंजूर झालेले आहेत आणि त्यातून एकूण २६२ गावांचे विद्युतीकरण करण्याचे काम प्रस्तावित केलेले आहे**, असे समितीला सांगितले. समितीने ज्या ज्या ठिकाणी वीज कनेक्शनची सोय अजून झालेली नाही आणि ज्यांना वीज द्यायची आहे त्या त्या ठिकाणी पत्रके काढून ग्रामसेवकांमार्फत आदिवासींची नावे घेण्यात यावी जेणे करुन ही योजना चांगल्याप्रकारे राबविली जाईल अशी शिफारस केली.